| MHKO140000482021 | नियमित दिवाणी दावा क्र.०७/२०२१<br>पुंडलिक बाळाप्पा कोरी.<br>**विरुद्ध**<br>पुनम संदीप नवलगी वगैरे. |
|---|---|

## नियमित दिवाणी मुकदमा क्र.०७/२०२१ मधील नि.क्र.२९ वरील आदेश

१. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्ज हा विना कैफियत आदेश रद्द करण्यासाठी व त्यांची कैफियत तसेच प्रतिदावा स्विकारण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जावर वादीतर्फे जोरदार हरकत घेण्यात आलेली आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रतिवादी क्र.१ यांनी विहित मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल न केल्याने नियमानुसार दावा विना कैफियत व म्हणणे पुढे चालविण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनानुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असल्याने कामकाज बंद असल्याने तसेच प्रतिवादी क्र.१ यांच्या आजारपणामुळे आवश्यक कागदपत्र गोळा करुन वकिलांना भेटून मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही असे सदर प्रतिवादी यांचे कथन आहे. प्रतिवादींनी जाणून बुजून विलंब केलेला नाही. अर्ज मंजूर केल्यावर वादीचे काही नुकसान होणार नाही. याउलट, वादीने सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून अर्जास प्रखर हरकत घेवुन अर्ज नामंजूर करण्याची वादीतर्फे विनंती केली आहे.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा वाटप, ठराव व निरंतर मनाई आदेशा करीता दाखल केला असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ यांनी हजर होऊनही मुदतीत कैफियत दिली नाही. अर्जातील कारणांचा विचार करता तसेच प्रतिवादी क्र.१ यांना नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.१ यांना त्यांची कैफियत व म्हणणे व

प्रतिदावा मांडण्याची संधी दिल्यावर प्रकरण गुणदोषावर व एकाच दाव्यामध्ये न्यायनिर्णयित होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

०१. प्रतिवादी क्र.१ यांना रक्कम रुपये ३००/– कॉस्ट वादी यांना देण्याच्या पुर्व अटीवर त्यांची नि.क्र.२८ कडील कैफियत व प्रतिदावा दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2023.01.18 16:44:39 +0630

ठिकाण–चंदगड. (चारुदत्त उद्धव शिपकुले)
दिनांक–१८.०१.२०२३. सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर चंदगड.